दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे  संपादक : बंडूभाऊ इंगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम | शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ | वर्ष : २ | अंक : २८२ | पाने : ४ | किंमत : ५ रूपये | Title code:- MAHMUL039353




# मुंबईचा 'किंग' कोण?

## आज फैसला ! २३ केंद्रांवर होणार मतमोजणी

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवार, १५ जानेवारी रोजी पार पडली. तर आज शुक्रवारी १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणातील राजकीय पक्षांच्या संख्याबळाचे चित्र शुक्रवारी संध्याकाळपर्यंत स्पष्ट होणार आहे.

मुंबई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान पार पडल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मतमोजणी होणार आहे. मुंबई महापालिकेने मतमोजणीसाठीची तयारी आधीच पूर्ण केली असून २३ ठिकाणी मतमोजणी पार पडणार आहे. यावेळी मतमोजणी उशीरा सुरू होणार आहे. या मतमोजणीकडेही सगळ्या राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. मतमोजणीसाठी 'पाडू' यंत्रणा प्रथमच वापरण्यात येणार असून या यंत्रणेविषयी राजकीय पक्षांनी संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे शुक्रवारी होणाऱ्या मतमोजणीतही गोंधळ होण्याची शक्यता आहे. मंबई महापालिकेत कोणाची सत्ता येणार याचे चित्र आज स्पष्ट होणार

मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवार, १५ जानेवारी रोजी पार पडली. तर शुक्रवारी १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणातील राजकीय पक्षांच्या संख्याबळाचे चित्र शुक्रवारी संध्याकाळपर्यंत स्पष्ट होणार आहे. त्यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

### १४ टेबल आणि एका वेळी दोन प्रभागांची मोजणी

मतमोजणीच्या दिवशी प्रत्येक प्रभागासाठी १४ टेबल असतील. एका वेळी दोन प्रभागांची मतमोजणी सुरू करण्यात येईल. ती पूर्ण झाली की पुढील दोन प्रभागांची मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण निकाल येण्यास आठ ते दहा तास लागण्याची शक्यता निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी २२७प्रभागांसाठी एकूण २३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शुक्रवार, १६ जानेवारी रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणी प्रक्रियेसाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाअंतर्गत अभिरक्षा कक्ष (स्ट्राँगरुम) व मतमोजणीची ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.

या सर्व ठिकाणांना सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलिस खात्याकडून आवश्यक ती मान्यता प्राप्त झाली आहे. या २३ ठिकाणीमतमोजणी पार पडणार आहे.

मुंबई महापालिकेकडे एकून २० हजार कंट्रोल युनिट आणि २५ हजार बॅलेट युनिट आहेत.

ही यंत्रे विक्रोळी आणि कांदिवली येथील गोदामांमध्ये ठेवण्यात येणार आहेत.

### मतमोजणीला उशीर का ?

दरवेळी निवडणुकीची मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू होते. मात्र यावेळी मतमोजणी १० वाजता होणार आहे. मतदानानंतर सलग दुसऱ्या दिवशी मतमोजणी होत असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुरुवारी मतदान पार पडल्यानंतर सगळी यंत्रे जमा करण्यास शुक्रवारची पहाट उजाडण्याची शक्यता आहे. त्यानंतर लगेचच सकाळी ही यंत्रे मतमोजणी केंद्रावर पोहोचण्यासाठी वेळ लागेल, हे गृहित धरून मतमोजणी उशीरा सुरू होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### काय आहे 'पाडू' यंत्रणा ?

मतमोजणीत तांत्रिक अडथळे येऊ नये म्हणून यंदा विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड बेंगलुरू या कंपनीची मतदान संयंत्रे वापरण्यात येणार आहेत. या मतदान यंत्रांद्वारे नोंदवलेल्या मतांची मतमोजणी करताना कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडूनच करणे आवश्यक आहे. जर कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडूनही मतमोजणी करताना तांत्रिक अडथळा येत असेल तर याच कंपनीने विकसित केलेल्या पाडू (प्रिंटींग ऑक्सिलरी डिस्प्ले युनिट) यंत्राचा वापर करून मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १४० पाडू यंत्रे मुंबई महापालिकेला अतिरिक्त म्हणून प्राप्त झाली असल्याची माहिती पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिली.

---

## अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे मतदारांसाठी मोफत सेवा



महाराष्ट्र जीत

**पनवेल / प्रतिनिधी :** नुकतेच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध उपाययोजना राबवण्यात आल्या. याच पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

अबोली महिला रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संतोष भगत यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १२ मध्ये मतदारांना त्यांच्या घरापासून मतदान केंद्रापर्यंत व मतदानानंतर पुन्हा घरी सोडण्याची मोफत रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी मोठा दिलासा मिळाला.

या सेवेमुळे अनेक मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदानात सहभाग घेतला असून लोकशाही प्रक्रियेला बळ मिळाले आहे. “मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. कोणत्याही अडचणीमुळे कोणीही मतदानापासून वंचित राहू नये,” अशी भूमिका अध्यक्ष संतोष भगत यांनी व्यक्त केली.

अबोली महिला रिक्षा संघटनेने लोकशाही बळकट करण्यासाठी उचललेली ही खारीचा वाट सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. सामाजिक जाणीव ठेवून राबवलेल्या या उपक्रमाबद्दल नागरिक, स्थानिक कार्यकर्ते आणि विविध स्तरांतून अध्यक्ष संतोष भगत व त्यांच्या संघटनेचे अभिनंदन केले जात आहे.

## शेलघरचे तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी साजरी

### वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्रशेठ घरत यांची जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट

महाराष्ट्र जीत

**उलवे, वार्ताहर :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे वडील दिवंगत तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी बुधवारी साजरी करण्यात आली. तुकाराम नारायण घरत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरुंगातही जावे लागले, परंतु ते मागे हटले नाहीत. त्यांनी त्याकाळी शैक्षणिक, सामाजिक चळवळ राबवली. तोच वसा आज महेंद्रशेठ घरत यांनी घेतला असून सामाजिक कार्यात त्यांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त महेंद्रशेठ घरत यांनी जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट देऊन आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम उलवे नोड मधील 'भूमिपुत्र भवन'मध्ये झाला.




यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, "महेंद्रशेठ यांनी आपल्या वडिलांचा वारसा उत्तमरित्या चालविला आहे. दिवंगत ज. आ. भगत यांची प्रेरणा घेऊन तो सर्वच क्षेत्रांत धडाडीने काम करतोय. वडिलांच्या नावे ज्युनियर महाविद्यालय, तर आईच्या नावाने यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था सुरू करून गोरगरिबांसाठी शैक्षणिक कार्य त्याने जोमाने सुरू ठेवले आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्ही निवडणुकीपुरते राजकारण करतो, बाकी आमच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी आम्ही घेतो."

यावेळी 'पैशाने तुटली नाती' हे नाटक सादर करण्यात आले. आगरी बोली भाषेतील हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. खचाखच भरलेल्या 'भूमिपुत्र भवन'मध्ये रसिकांच्या टाळ्यांनी कलाकारांची मने जिंकली. भूमिपुत्र भवनमध्ये 'पैशाने तुटली नाती' हे पहिल्यांदाच नाटक सादर करण्यात आले. त्यामुळे कलाकार, रसिक यांच्या प्रेमाला भरते आले होते.

दिवंगत तुकाराम नारायण घरत यांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, उरण नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, महेंद्रशेठ यांचे सासरेबुवा रामशेठ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील आदी शेकडो मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या गव्हाण येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि खारकोपर येथील दिवंगत तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्येही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

## संपादकीय

### दोस्तीपासून दुराव्यापर्यंत

कित्येक वर्षे सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे आखाती प्रदेशातील जवळचे सहकारी म्हणून ओळखले जात होते. राजकारण, सुरक्षा, अर्थकारण अशा अनेक पातळ्यांवर दोन्ही देशांनी हातात हात घालून काम केले. मात्र गेल्या काही काळात या संबंधांत मोठा बदल झाला असून, परस्पर अविश्वास इतका वाढला आहे की मैत्रीचे रूपांतर थेट शत्रुत्वात झाले आहे. सध्या येमेनच्या मुद्द्यावरून दोन्ही देशांमधील तणाव उघड संघर्षापर्यंत पोहोचला आहे.

येमेनच्या भूमीवर सौदी अरेबिया आणि यूएई यांच्यात प्रत्यक्ष लष्करी चकमक घडली. सौदी अरेबियाने येमेनमध्ये यूएईशी संबंधित शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीवर हवाई हल्ला केल्याने संबंध अधिकच बिघडले. सौदी सैन्याने दक्षिण येमेनमधील मुकाल्ला या महत्त्वाच्या बंदरावर वारंवार बॉम्बहल्ले केले. परिणामी तणाव इतका वाढला की सौदी समर्थित येमेनी सरकारने यूएईच्या सैन्याला २४ तासांत देश सोडण्याचा अल्टिमेटम दिला. त्यानंतर यूएईने आपल्या उर्वरित फौजा तातडीने परत बोलावल्या आणि येमेनमधील लष्करी उपस्थिती संपवण्याची घोषणा केली.

इतिहास पाहिला तर या दोन देशांतील मतभेद नवीन नाहीत, जरी ते दीर्घकाळ अतिशय जवळचे मित्र राहिले असले तरी. आखाती राजकारणात त्यांच्या मैत्रीचे दाखले दिले जात; पण बदलत्या हितसंबंधांमुळे हे संबंध तुटू लागले. एकेकाळी कट्टर मित्र असलेले हे दोन प्रमुख मुस्लिम देश आता आर्थिक स्पर्धा, प्रादेशिक प्रभावासाठीची चढाओढ आणि वेगवेगळ्या धोरणांमुळे परस्परविरोधी बाजूंवर उभे राहिले आहेत.

सुरुवातीपासूनच सौदी अरेबियाने यूएईला पाठिंबा दिला होता. दोन्ही देश सुन्नी मुस्लिमबहुल राजेशाही आहेत आणि त्यांची अर्थव्यवस्था तेलावर अवलंबून आहे. इराणच्या वाढत्या प्रभावाबद्दलची समान चिंता आणि आखाती स्थैर्य टिकवण्याचे उद्दिष्ट यामुळे त्यांची जवळीक वाढली. २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान आणि यूएईचे नेते मोहम्मद बिन झायेद यांच्यातील वैयक्तिक संबंधांमुळे ही मैत्री अधिक घट्ट झाली. इस्लामी कट्टरतावाद आणि इराणविरोधात दोघेही एकत्र उभे राहिले.

२०११ च्या अरब स्प्रिंगनंतर या युतीला अधिक धार आली. बहरीनमधील उठाव दडपण्यासाठी संयुक्त सैन्य पाठवणे, इजिप्तमध्ये मुस्लिम ब्रदरहूडविरोधात सहकार्य करणे आणि २०१५ मध्ये येमेनमध्ये हौथी बंडखोरांविरुद्ध लष्करी कारवाई सुरू करणे—या सर्व टप्प्यांवर दोघे एकत्र होते. मात्र २०१९ मध्ये यूएईने येमेनमधून सैन्य माघारी घेऊन दक्षिणी फुटीरतावाद्यांना पाठिंबा दिला, तर सौदी अरेबिया येमेनी सरकारच्या बाजूने राहिला. याच ठिकाणी मतभेद ठळक झाले.

यानंतरही दुरावा वाढत गेला. कतारवरील बहिष्कार, इस्रायलशी यूएईने वाढवलेले संबंध, ओपीईसीमधील मतभेद, परदेशी गुंतवणुकीसाठी रियाध–दुबई स्पर्धा आणि सुदानमधील गृहयुद्धात घेतलेल्या भिन्न भूमिका—या सर्व कारणांनी संबंध अधिक ताणले गेले. येमेनमधील मुकाल्ला बंदरावरील हवाई हल्ला हा या संघर्षाचा ताजा आणि थेट नमुना ठरला.

सौदी अरेबियाच्या मते, या हल्ल्याचा उद्देश यूएई समर्थित फुटीरतावाद्यांना पोहोचवली जाणारी लष्करी मदत थांबवणे हा होता; तर यूएईने हा दावा फेटाळून लावून, त्या मालवाहतुकीत केवळ पुरवठा आणि उपकरणे असल्याचे सांगितले. या घटनेनंतर दोन्ही देशांतील तणाव आणखी तीव्र झाला.जरी यूएईच्या माघारीमुळे तणाव कमी होईल, अशी अटकळ बांधली जात असली, तरी प्रत्यक्षात दोन्ही देशांच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षा आता स्पष्टपणे समोरासमोर उभ्या ठाकल्या आहेत. एकेकाळची घट्ट मैत्री आता संशय, स्पर्धा आणि संघर्षात बदलली असून, आखाती राजकारणात नवे समीकरण तयार होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# शाश्वत विकासासाठी आजचा युवक : प्राचार्य प्रो.डॉ. पंचशील एकंबेकर

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर तालुक्यातील हानेगाव येथील कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगाव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष वार्षिक युवक शिबिराचे आयोजन मौजे कामाजीवाडी येथे दिनांक १० जानेवारी २०२७ ते १६ जानेवारी २०२६ पर्यंत संपन्न होत आहे .या विशेष वार्षिक शिबिराचे उद्घाटन दि.१० जानेवारी २०२६ रोजी मौजे कामाजीवाडी येथे पो. बे. आ. शाळा शिळवणी येथील प्राचार्य मा.श्री स्वरूपसिंग राठोड यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने व सरस्वती प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. शिबिरास



उपस्थित असलेल्या पाहुण्यांचे स्वागत बीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीताने केले. प्रास्ताविक भाषणातून प्रो. डॉ. उत्तम मानवते यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगून सात दिवसात होणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेऊन शाश्वत विकासासाठी राष्ट्राला आजच्या युवकांची खूप गरज आहे. असे म्हणाले. प्रा.डॉ.बिरादार यांनी महात्मा गांधीजींची खेड्याकडे चला ही संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडली. तर कामाजीवाडी नगरीचे सरपंच प्रतिनिधी राष्ट्रीय सेवा योजना हे देशाच्या विकासासाठी एक उत्तम योजना आहे.तर या शिबिराचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. साबणे ए. जी यांनी साने गुरुजींच्या गीतातून शिबिरार्थ्यात नवचैतन्य निर्माण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. पंचशील एकंबेकर यांनी आजचा युवक शाश्वत विकासात होणाऱ्या बदलांचे संरक्षण करणे व जलसंधारणाचे व्यवस्थापन करून राष्ट्रहित साधने हे राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका आहे.असे अध्यक्षीय समारोपातून आपले विचार प्रकट केले. या कार्यक्रमासाठी गावातील मान्यवर माजी सरपंच दिगंबर रेड्डी, तंटामुक्ती अध्यक्ष सोपानराव बिरादार,विठ्ठल राजकुंडल,गुणवंत पाटील, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.प्राथमिक शाळा कामाजीवाडी येथील मुख्याध्यापक वंडगिरे व बन्नारे सर होते. या शिबिराचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सौ कांबळे एस. एस. यांनी केले.तर आभार वैभव जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा. डॉ. सूर्यकांत कळसकर प्रा.डॉ.आनंद शिंदे,प्रा. डॉ. पवन एमेकर,प्रा. डॉ. बालाजी राठोड, महाविद्यालयाचे ओ एस.भाऊराव पवार वरिष्ठ लिपिक जयप्रकाश झमकाडे, शंकर राठोड, रोहित कांबळे, संतोष सुरेवाड,मारुती चव्हाण, मोहसीन मचकुरी, प्रवीण राठोड आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी अनेक शिबिरार्थी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केला.

# अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाचा ऐतिहासिक टप्पा

## वर्षभरात 10 हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन

महाराष्ट्र जीत

**संजय वानखेडे अमरावती :** रक्तकेंद्र व रक्त घटक विलगीकरण केंद्र, अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय विभागाने रुग्णसेवेमध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. सन 2025 या वर्षात शासकीय रक्तकेंद्र अमरावती यांनी 10 हजार 190 रक्त पिशव्यांचे संकलन केले असून, गेल्या चार वर्षात या रक्तकेंद्राने 40 हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन करून हजारो रुग्णांना जीवनदान दिले आहे. या वर्षात शासकीय रक्तकेंद्राने एकूण 227 रक्तदान शिबिरे यशस्वीपणे पार पाडली असून, यामुळे सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफेलिया तसेच जटिल शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे.

जिल्ह्यातील एकमेव शासकीय रक्तपेढी असल्यामुळे हे केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, क्षय रुग्णालय आणि अच्च्युत महाराज रुग्णालयासोबतच जिल्ह्यातील खाजगी रुग्णालये व सहा रक्त साठवणूक केंद्रांना



नियमित रक्तपुरवठा करीत असते. जिल्ह्यालगतच्या मेळघाट येथील आदिवासी बांधव, गर्भवती माता, लहान बालके तसेच चिखलदरा व धारणी येथील रुग्णांनाही येथून मोठ्या प्रमाणात रक्ताचा पुरवठा केला जातो. विशेषतः सिकलसेल आणि ॲनिमियाग्रस्त रुग्णांना दर पंधरा दिवसांनी रक्ताची गरज भासते, त्यांच्यासाठी हे केंद्र अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत आहे.

खासदार 365 दिवस रक्तदान मोहिमेअंतर्गत राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले आणि रक्त केंद्र प्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य करण्यात आले असून अविरत सुरु आहे. जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे आणि समुपदेशक योगेश पानझाडे यांच्या अथक प्रयत्नांमुळे व संपूर्ण अधिकारी-कर्मचारी चमूच्या सहकार्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना वेळेवर रक्त पुरवठा करणे शक्य होत आहे.

रक्ताची ही गरज निरंतर असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संस्था, महाविद्यालये आणि तरुण मंडळांनी रक्तदान शिबिरांसाठी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार व रक्त केंद्रप्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांनी केले आहे.

# सिंदखेड पोलिसांची अवैध्य गोवंश वाहतुकीवर कारवाई

महाराष्ट्र जीत

**सुभाष खडसे :** माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरीत्या गौवंशाची वाहतूक करणाऱ्या वाहनावर सिंदखेड पोलिसांनी कारवाई करत २ लाख ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई दि.13 जानेवारी रोजी दुपारी 2.30 वाजता करण्यात आली.






जिल्हा पोलीस अधीक्षक मा. अविनाश कुमार,अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डी.एस.हाके, माहूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सिंदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेशराव जाधवर , पोलीस जमादार गोविंद कदम, पोलीस कर्मचारी संदीप वानखेडे व संजय शेंडे यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली. तपासणीदरम्यान मॅक्स पिकअप वाहन (क्र. MH 26 AH 4326) मध्ये अवैधरीत्या गौवंश जनावरांची वाहतूक होत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी वाहन चालक संतोष भिकू पवार (वय 52) याच्याविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण कायदा 1976 तसेच भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये वाहतूक करणारे वाहन व गौवंश जनावरांचा समावेश असून त्याची एकूण किंमत 2,47,000 रुपये इतकी आहे. सदर जनावरे अत्यंत क्रूर पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले असून ही गौवंश कत्तलखान्याकडे नेत असल्याचा संशय आहे. त्या दृष्टीने पुढील तपास सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेशराव जाधवर यांनी दिली.

अवैध जनावर वाहतुकीविरोधात पुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# तिवसा ग्रामपंचायतची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत पाहणी

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण/ सारकिन्ही :** बार्शीटाकळी तालुक्यातील तिवसा बु!! ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत राज अभियान. अंतर्गत दि१५/१/२०२६ रोजी गावाची पाहणी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी अकोला अनिता मेश्राम मॅडम हे होत्या, त्यांनी ग्राम तिवसा ग्रामपंचायत आयुष्यमान आरोग्य मंदिर' शाळा येथे भेट दिली

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रमांमध्ये ग्राम तिवसा येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे व ग्रामपंचायत सर्व सदस्य व सर्व ग्रामस्थ आयुष्यमान आरोग्य मंदिर विभागातील कर्मचारी शाळेतील शिक्षक वृंद यांनी सहभाग घेतला गावाचा विकास पाहणी करण्याकरिता माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम यांनी भेट दिली

गतवर्षी 2025 ला ग्राम तिवसा





यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामध्ये सहभाग घेऊन ग्रामपंचायतला तिसरा क्रमांक मिळाला होता व गावकऱ्याचा आनंद द्विगुणीत झाला व आता थांबायचं नाही ही संकल्पना मनात घेऊन सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे यांनी पुन्हा नव्याने सुरुवात करून एकच ध्यास गावचा विकास हेच ध्येय ठेवले व गावाची एका वर्षात जणू कायापालट केली फळाफुलांनी भरलेली स्मशानभूमी गावाचे रस्ते गावाला रस्ता रुंदीकरण रस्त्याच्या कडेला झाडे शाळांमध्ये पाण्याची व्यवस्था मार्गदर्शनपर रंगरंगोटी व मुलांना परसबाग संपूर्ण गावांमध्ये सांडपाण्याची योग्य विल्हेवाट करिता शोषखड्डे पाणी अडवा पाणी जिरवा मार्गदर्शनपर रंगरंगोटी गुरांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था अशी अनेक कामे श्रीमती मंदाताई यांनी केली व त्यांचे हे कार्य पाहण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम उपमुख्य कार्यकारी अधिकारी परिहार, गटविकास अधिकारी पवार,विस्तार अधिकारी इंगळे साहेब इंगळे मॅडम, धुमाळ कृषी विस्तार अधिकारी,भोयर, अनिता भगत अभियंता,यांनी ग्राम तिवसा भेट दिली भेटी दरम्यान संपूर्ण गावाची पाहणी तसेच आयुष्मान आरोग्य मंदिर तिवसा व शाळा अंगणवाडी स्मशानभूमी येथे भेट दिली व कामाची पाहणी करून मॅडमनी समाधान व्यक्त केले गावाची पाहणी करून मॅडम यांनी गावातील ग्रामपंचायत सर्व सदस्य सर्व ग्राम गावातील ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले.

# वाशिम जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी चे कोंडाळा महाली येथे भव्य उद्घाटन

महाराष्ट्र जीत

**करंजा तालुका प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती व नवसर्जनशीलता रुजविण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी वाशिम जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी 2026 ही श्री ज्ञानेश्वर माऊली विद्यालय व श्री मनोहरराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, कोंडाळा महाली येथे दिनांक 15 व 16 जानेवारी 2026 रोजी भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. या दोन दिवसीय विज्ञान महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार, 15 जानेवारी 2026 रोजी अत्यंत उत्साहात पार पडले.

या विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन श्रीमती मंगल धुपे / गायकवाड, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्ही. एस. चव्हाण, संस्था सचिव, जनता बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक



मंडळ कोंडाळा महाली हे विराजमान होते.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संजयजी ससाने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद वाशिम, के. एम. बिरादार, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद वाशिम, मुकमाले , केंद्रप्रमुख, पारडी टकमोर केंद्र, विजयजी भड, सचिव, अमरावती विभागीय विज्ञान अध्यापक मंडळ, प्राचार्य डि यू कव्हर , उदयसिंग राठोड, मा. सरपंच, संतोष गिर्रे, जिल्हाध्यक्ष, विज्ञान अध्यापक मंडळ, ललित भुरे, विज्ञान पर्यवेक्षक, बाळासाहेब गोटे, मुख्याध्यापक संघ वाशिम, देवरावजी पाटील, सरपंच, कोंडाळा महाली, किशोर उंडाळ, जिल्हा सचिव विज्ञान अध्यापक मंडळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत वाशिम जिल्ह्यातील जवळपास सहा तालुक्यांमधून एकूण 72 विज्ञान प्रकल्प (मॉडेल्स) सहभागी झाले असून, त्यामध्ये प्राथमिक विद्यार्थी गट, माध्यमिक विद्यार्थी गट, प्राथमिक शिक्षक गट, माध्यमिक शिक्षक गट, प्रयोगशाळा सहाय्यक गट तसेच दिव्यांग गट यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेली पर्यावरणपूरक, तंत्रज्ञानाधारित, आरोग्य, ऊर्जा, जलसंधारण, डिजिटल सायन्स व दैनंदिन जीवनाशी निगडित विज्ञान मॉडेल्स उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात विज्ञान प्रदर्शनांचे महत्त्व अधोरेखित केले. “विज्ञान प्रदर्शने ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, प्रयोगशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता व आत्मविश्वास निर्माण करणारे व्यासपीठ आहे,” असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या भव्य विज्ञान प्रदर्शनीच्या यशस्वी आयोजनामध्ये विज्ञान अध्यापक मंडळ, वाशिम जिल्हा तसेच मुख्याध्यापक संघ, वाशिम यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. जिल्ह्यातील विज्ञान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विज्ञान प्रकल्प तयार करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले, तर मुख्याध्यापक संघाने आयोजनाच्या नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत सक्रिय सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास जिल्हाभरातील विज्ञान शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहून विज्ञानातील नाविन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्ष अनुभवण्याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे शिस्तबद्ध व प्रभावी आयोजन केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजक संस्था, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सर्व समिती सदस्यांचे विशेष कौतुक केले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## सायबर सुरक्षा व कृत्रिम बुद्धिमत्तेवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**प्रदीप पोटफोडे :** दि. 15 जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ विद्यालय, विहामांडवा तसेच ज्ञानदीप विद्यालय, विहामांडवा येथे सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शन सत्रात योगेश उबाळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियावरील धोके, डेटा सुरक्षा तसेच AI चा शिक्षण, करिअर आणि दैनंदिन जीवनातील वाढता वापर याबाबत सखोल माहिती दिली.

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि सकारात्मक वापर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाच्या खबरदारी उपाययोजना, पासवर्ड सुरक्षा, फिशिंग व सायबर हल्ल्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही भविष्यातील करिअरसाठी कशी उपयुक्त




ठरणार आहे, AI मुळे निर्माण होणाऱ्या नव्या संधी, विविध क्षेत्रांतील उपयोग आणि विद्यार्थ्यांनी कोणती कौशल्ये विकसित करावीत यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना योगेश उबाळे यांनी सविस्तर उत्तरे देत त्यांचे शंकानिरसन केले.या कार्यक्रमाचे आयोजन विवेकानंद कॉम्प्युटर, विहामांडवा यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# कारंजातील ऐतिहासिक दिल्ली वेश लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड :** कारंजा शहराच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक ‘दिल्ली वेश’च्या दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. नगर परिषद, कारंजा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.

लोकार्पण सोहळ्याचे उदघाटन आमदार सईताई प्रकाश पाटील डहाके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न .प .उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले होते. प्रमुख उपस्थितीत माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, नगरसेवक जाकीर शेख, सर्व नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते शेख महेबूब, सर्वधर्मीय मित्र मंडळाचे अध्यक्ष श्याम सवाई यांची उपस्थिती



होती.

‘दिल्ली वेश’ हा मार्ग अनेक वर्षांपासून शहराच्या मुख्य वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नगर परिषदेच्या पुढाकारातून या ऐतिहासिक प्रवेशद्वाराची दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे वाहतूक सुरळीत होणार असून शहराच्या सौंदर्यातही भर पडली आहे.

कार्यक्रमादरम्यान अध्यक्षीय भाषण करताना ॲड. फिरोज शेकुवाले यांनी, शहराचा ऐतिहासिक वारसा जपतानाच आधुनिक विकासाला गती देण्याची भूमिका नगर परिषदेची असल्याचे नमूद केले. तसेच नागरिकांच्या सहकार्यामुळेच ही विकासकामे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, नगरसेवक जाकीर शेख तसेच श्याम सवाई यांनीही आपले मनोगत व्यक्त करत ‘दिल्ली वेश’च्या जतन व सुशोभीकरणामुळे शहराच्या ऐतिहासिक ओळखीला बळ मिळाल्याचे सांगितले. अशा विकासकामांमुळे नागरिकांचा दैनंदिन त्रास कमी होऊन शहराच्या प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकार्पणानंतर ‘दिल्ली वेश’ मार्ग नागरिकांसाठी खुला करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नगर परिषद प्रशासन, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या सोहळ्यामुळे कारंजा शहराच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## भोकर नगरपरिषद उपनगराध्यक्षपदी दिलीप सोनवडे याची बिनविरोध निवड

**भोकर / उत्तम कसबे :** नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषद कार्यालय येथे दि .१३ रोज मंगळवारी ११ वाजता बैठक आयोजीत करण्यात आली .

निवडणुक निर्वाचन अधिकारी तथा मुख्यधिकारी ऋषभ पवार यांच्या उपस्थितीत दिलीप सोनवडे यांची बिनविरोध निवड झाली .

भोकर नगरपरिषद उपनगराध्यक्ष पदासाठी दिलीप गुरप्पा सोनवडे यांचा एक अर्ज असल्याने निवडणुक विभागाने दिलीप सोनवडे यांची बिनविरोध



निवड घोषीत केली .

ह्यावेळी भाजपा गटनेते विठ्ठल धोंडगे गटनेते शेख नाजीम नगरसेवक वैशाली बोलेवार साईप्रसाद जटालवार शिल्पा पोकलवार आरती यशवंतकर योगेश देशपांडे सपनाराणी पिटलेवाड सुहास पवार वनश्री लक्षटवार राजेश्वर देशमुख डॉ कनीज फातेमा इनामदार साबेरा बेगम इनामदार माया कसबे अविनाश वाघमारे अर्चना बिल्लरवार संजय घंटलवार शेख जरीना बेगम छाया गिमेकर विजय पवार यांची उपस्थिती होती .

भोकर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल ओबीसी समाजातील सर्वसामान्यकार्यकर्त्याला नगरपरिषदेच्या माध्यमातून नेतृत्व करण्याची संधी दिली संधीच सोन करू भोकरवासीयाच्या अडीअडचणी समस्या सर्वानुमते ठराव घेवुन दुर करू असल्याची प्रतिक्रिया दिलीप सोनवडे यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केली . माजी मुख्यमंत्री तथा खा . अशोकराव चव्हाण मा .आ .अमिता ताई चव्हाण आ . श्रीजया चव्हाण भाजप पक्षश्रेष्ठी नेते पदधिकारी सामाजिक कार्यकर्ते राजकिय क्षेत्रातील कार्यकर्ते पदधिकारी मित्रमंडळ हितचिंतक नातेवाईक मंडळीचे प्रभागातील मतदारांचे आभार मानले .

## जिजाऊंचे संस्कार व विवेकानंदांचे विचार आजही मार्गदर्शक - प्रा. विश्वजीत वानखडे

### ड्रीम स्वेअर अकॅडमीच्यावतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**अकोला , प्रतिनिधी** - राष्ट्रनिर्मितीमध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे असून जिजाऊंचे संस्कार व विवेकानंदांचे विचार आजही मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन ड्रीम स्वेअर अकॅडमीचे संचालक प्रा. विश्वजीत वानखडे यांनी यावेळी व्यक्त केले.

ड्रीम स्वेअर अकॅडमी बाळापूरच्या वतीने ड्रीम स्वेअर अभ्यासिका श्रीराम मंदिर



सभागृह येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड्रीम स्वेअर अकॅडमीचे संचालक प्रा. विश्वजीत वानखडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद तेलगोटे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. उमेश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजना तायडे, रोहिणी राऊत, वृषाली वानखडे, मंगेश नितनवरे, गौरव नळकांडे, गौरव तायडे, रोशन दामोदर आदींनी परिश्रम घेतले.

## पत्रकार अजय ढवळे यांची आंबेडकर प्रेस कॉन्सिल या संघटनेच्या वाशिम जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** स्थानिक वाशिम येथील गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले अजय ढवळे यांची नुकतीच आंबेडकर प्रेस कॉन्सिल या संघटनेच्या वाशिम जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. अजय ढवळे गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत त्यांनी आपल्या लिखाणाच्या माध्यमातून अनेकांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर



त्यांनी सामाजिक कार्याचे माध्यमातून देखील आपली स्वतंत्र ओळख निर्माण केलेली आहे या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांची दिनांक 9 जानेवारी 2026 रोजी त्यांना एका नियुक्ती पत्राद्वारे ही नियुक्ती देण्यात आलेली आहे.या नियुक्ती पत्रामध्ये फुले शाहू आंबेडकरवादी पत्रकारितेत भरघोस आणि सकारात्मक योगदान लाभो या मंगल कामनेसह त्यांना आंबेडकर प्रेस कॉन्सिल या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड रावण धाबे यांनी हार्दिक शुभेच्छा दिलेले आहेत. अजय ढवळे यांची आंबेडकर प्रेस कॉन्सिल या संघटनेच्या वाशिम जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे जिल्ह्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रात्रीला वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर चे चित्रीकरण केले म्हणून पत्रकाराला बेदम मारहाण मोबाईल फोडला

**सुभाष खडसे :** माहुर शहरासह तालुक्यात अवैध वाळू तस्करीला अचानक पणे उत आला असून अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनाचे चित्रीकरण करीत असलेल्या युवा ग्रामीण पत्रकार संघाचे सदस्य सदानंद पुरी यांना वाळू तस्करांनी मारहाण करून त्यांचा मोबाईल संच फोडल्याची घटना दि 12 .2 2026 रोजी. रात्री 9-45 वाजताचे सुमारास घडली या प्रकरणी पत्रकार सदानंद पुरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाळू तस्करां विरोधात माहुर पोलीसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या घटनेने माहुर शहरासह तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून याबाबत जनतेतून तिव्र संताप व्यक्त केला जात आहे.पत्रकार सदानंद पुरी हे दि 12 2 2026 रोजी रात्री 9-45 वाजता घराकडे जात असतांना शासनाचे नियम धाब्यावर बसवून अवैधरित्या वाळू तस्करी करणारे वाहन दिसताच पत्रकार सदानंद पुरी यांनी आपल्या मोबाईलमध्ये सदर वाहनाचे चित्रीकरण केले. वाहन चालकाने

याबाबतची माहिती टिप्पर मालकास दूरध्वनीवरून दिली.असता टिप्पर चालक व त्याच्या साथीदारांनी तक्रारदारास रस्त्यात अडवून टिप्परचे फोटो का काढले अशी विचारणा करुन वाद घालत अर्वाच्य भाषेत शिविगाळ करुन वाद घातला या वादाचे रुपांतर मारहाणीत झाले एवढ्यावरच न थांबता तक्रारदाराच्या हातातील मोबाईल हिसकावून जमीनीवर आदळुन फोडला यामध्ये तक्रारदाराचे 23000 रुपयाचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.या घटनेनंतर पत्रकार सदानंद पुरी यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यांच्या तक्रारीवरुन माहुर पोलीसांनी चारआरोपी विरोधात विविध कलमान्वये गुन्हा करण्यात आला असून याप्रकरणाचा पुढील तपास पो ना सत्यपाल मडावी हे करित आहेत.

एकीकडे सिंदखेड पोलीस एका वर तडीपरीचे आदेश काढून तडीपार करतात तर दुसरीकडे माहूर पोलीस ठाणे सिंदखेड पोलीस ठाणे यासह तहसील कार्यालयात या आरोपी विरोधात अनेक गुन्हे कारवाया दाखल असल्याची चर्चा असून यांच्यावर माहूर पोलीस ठाणे तडीपारिची कारवाई का करत नाही हे न उघडणारे कोडे असून एका नेत्याच्या भरोशावर सदरील आरोपी हा मी माहूर तालुक्याचा वाल्मीक कराड असल्याचे सर्वा समोर सांगून छाती बडवत असताना त्याचे वर कारवाई होत नाही तसेच एक वाळू तस्कर फेसबुक वर एका नगरसेवकाला टॅग करून पत्रकाराबद्दल धमकी वजा आक्षेपार्य लिखाण लिहून टेंभा मिरवतो आणि हे सर्व महसूल पोलीस विभागातला माहीत आहे परिणामी एखाद्या पत्रकाराचा रात्रीला चित्रीकरण करताना जीवास धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे त्यांचे वर तत्काळ तडीपारीची कारवाई प्रस्तावित करावी अशी मागणी होत आहे

# गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक कांदा बीज व हळद पिकांची शिवार फेरी व तांत्रिक चर्चा सत्र यशस्वीपणे संपन्न

**वाशिम(प्रतिनिधी) :** जिल्ह्यात नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सातत्याने वाढत असून, गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती तंत्रज्ञान विविध पिकांमध्ये यशस्वी ठरत असल्याचे प्रत्यक्ष शेतस्तरावर दिसून येत आहे. मातीची सेंद्रिय कर्ब पातळी वाढवणे, सूक्ष्मजीव क्रियाशीलता सुधारणे तसेच पीक उत्पादनाची गुणवत्ता व शाश्वतता वाढवणे या दृष्टीने ही पद्धत उपयुक्त ठरत आहे.

वाशिम जिल्ह्यातील मौजे भर जहागीर, तालुका रिसोड येथे सुमारे 40 ते 45 शेतकरी मागील हंगामापासून हळद व कांदा बीज ही उद्यानविद्या पिके गोकृपा अमृत नैसर्गिक शेती पद्धतीवर आधारित घेत असून, हे उपक्रम कृषी विज्ञान केंद्रा अंतर्गत उद्यानविद्या तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली तसेच जय भवानी नैसर्गिक शेती गटाचे पुढाकारकर्ते श्री. रामकिशन चोपडे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबविले जात आहेत. याच अनुषंगाने जय भवानी नैसर्गिक शेती गटाच्या वतीने दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती या विषयावर शिवार फेरी व तांत्रिक चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे उद्यानविद्या तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील उपस्थित होते,



तर अध्यक्षस्थानी श्री. रामकिशन चोपडे हे होते. यावेळी नवचैतन्य गोकृपा अमृत परिवाराचे श्री. गोविंद देशमुख, श्री. सुशांत आटोळे, श्री. दीपक बुधवंत व श्री. गोपाल सुलताने यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात शेतकरी श्री. अनिल काळदाते, श्री. गजानन कोकरणे, श्री. रामेश्वर तायडे आदींच्या हळद व कांदा बीज पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक स्थिती, वाढ, रोग–कीड व्यवस्थापन व उत्पादन क्षमतेबाबत निरीक्षण नोंदविण्यात आले.

तांत्रिक मार्गदर्शन सत्रात श्री. निवृत्ती पाटील यांनी गोकृपा अमृत नैसर्गिक शेती पद्धतीचे वैज्ञानिक महत्त्व स्पष्ट करताना “माती सक्षम तर पीक सक्षम” या संकल्पनेवर भर दिला. देशी गायीच्या शेणावर आधारित गोकृपा अमृत हे मातीची जैविक सुपीकता, सूक्ष्मजीव संतुलन व पीक जोम वाढविण्यास प्रभावी असल्याचे त्यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले. यासोबतच कांदा बीज व हळद पिकांचे पुढील हंगामी नियोजन, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन व उत्पादन दर्जा सुधारणा या बाबींवर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी श्री. सुशांत आटोळे यांनी सेंद्रिय उत्पादनांच्या बाजारपेठीय मागणीच्या पार्श्वभूमीवर सेंद्रिय प्रामाणिकरण (Organic Certification) ची गरज अधोरेखित करत, नवचैतन्य शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सेंद्रिय प्रामाणिकरण मोहिमेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. रामकिशन चोपडे यांनी जय भवानी नैसर्गिक शेती गटाच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती व देशी गोपालनाचा प्रचार–प्रसार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## कृषी विज्ञान केंद्राद्वारे अन्न प्रक्रिया उद्योगासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेअंतर्गत क्षमता बांधणी व अन्न प्रक्रिया उद्योग या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक 7 ते 9 जानेवारी 2026 दरम्यान विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक, युवक, महिला व शेतकऱ्यांना तांत्रिक, व्यावसायिक तसेच उद्योजकता विकास विषयक सखोल व शास्त्रीय मार्गदर्शन देणे हा होता. या कार्यक्रमात हीना शेख, उपसंचालक कृषी विभाग, वाशिम तसेच जिल्हा नोडल अधिकारी, यांनी योजनेची उद्दिष्टे, लाभार्थी निवड प्रक्रिया, अनुदान व कर्ज संलग्नता तसेच शासकीय सहकार्याच्या विविध बाबींची सविस्तर व वस्तुनिष्ठ माहिती दिली. डॉ. सुधीर देशमुख, प्रशिक्षण जिल्हा नोडल अधिकारी व ईडीपी प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया उद्योगातील उदयोन्मुख व्यवसाय संधी, शेतीमालाचे मूल्यवर्धन, बाजारपेठ व्यवस्थापन, विपणन धोरणे तसेच उद्योजकतेच्या विविध शास्त्रीय पैलूंवर मार्गदर्शन केले. यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की योजना ही ग्रामीण भागातील युवक, महिला व



शेतकऱ्यांसाठी शाश्वत स्वयंरोजगार निर्मितीची प्रभावी संधी असून अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतीमालाला योग्य दर, गुणवत्तापूर्ण मूल्यवर्धन व व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. कृषी विज्ञान केंद्रामार्फत तांत्रिक प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, उद्योजकता मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शुभांगी वाटाणे, प्रमुख, गृहविज्ञान व जिल्हा प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण अन्न सुरक्षा मानके, पॅकेजिंग, ब्रँडिंग तसेच महिलांसाठी उपलब्ध व्यवसाय संधी यावर सखोल व तांत्रिक माहिती दिली.

तसेच अर्चना कदम, ईडीपी प्रशिक्षक यांनी उद्योग व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, खर्च-उत्पन्न विश्लेषण व यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक कौशल्य विकासावर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या अंतिम दिवशी सहभागी लाभार्थ्यांसाठी मंगरूळपीर तालुक्यातील मौजे मानोली येथील योजनेचे लाभार्थी श्री. विशाल माहुलकर यांच्या 'व्यंकटेश ऑईल मिल' या युनिटला प्रत्यक्ष भेट आयोजित करण्यात आली.

# 'एमपीएससी' मार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे 'सशर्त जातवैधता' रद्द !

## किनवट समितीचा दणका ; आयोगाच्या कारवाईकडे आदिवासी बांधवांचे लक्ष

महाराष्ट्र जीत

**भिवंडी(सुनील झळके) :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र वित्त आणि लेखा सेवा विभागात सहाय्यक संचालक वर्ग १ पदांवर ५ जानेवारी २०२६ रोजी निवड झालेल्या शिल्पा उत्तम निलावाड या उमेदवाराने 'मन्नेरवारलू' अनुसूचित जमाती प्रवर्गाचे मिळविलेले 'सशर्त जातवैधता' प्रमाणपत्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती किनवट यांनी ९ जानेवारी २०२६ रोजी अवैध ठरविले आहे.आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग काय करतात. याकडे राज्यातील आदिवासी बांधवांचे लक्ष लागले आहे

शिल्पा निलावाड यांनी त्यांचा 'मन्नेरवारलू' अनुसूचित जमातीचा प्रस्ताव प्राचार्य गुरुगोविंदसिंह इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, विष्णूपुरी,नांदेड यांच्या मार्फत शैक्षणिक प्रयोजनार्थ समितीस पाठवला होता. हा प्रस्ताव समितीला २० डिसेंबर २०१६ रोजी प्राप्त झाला होता.किनवट समितीने सखोल चौकशी करुन कायद्यातील विहीत तरतुदी अन्वये २७ डिसेंबर २०२१ रोजी त्यांचा 'मन्नेरवारलू' जमातीचा दावा अवैध घोषित करण्यात आला होता.

समितीच्या या आदेशाला त्यांनी उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.४४४७/२०२२ अन्वये आव्हानीत केले होते.तथापि २२ सप्टेंबर २०२२ रोजी उच्च न्यायालयाने ही याचिका अंशतः मंजूर केली आणि समितीचा २७ डिसेंबर २०२१ चा वादग्रस्त निकाल रद्द केला आणि याचिकाकर्त्याला १० दिवसाच्या आत अटींवर 'मन्नेरवारलू' जमातीचे वैधता प्रमाणपत्र देण्याचे आदेश दिले होते.वैधताधारक यांच्या रक्त नातेवाईकांचे पुनर्पडताळणी प्रकरणी कार्यवाही पूर्ण होऊन शिल्पा निलावाड यांचे सशर्त जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरले आहे.

आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या 'ट्रायबल फोरम' या संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष अँड.प्रमोद घोडाम यांनी राज्यात ३ हजार सशर्त जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित झाला असल्याचा दावा करीत संबंधित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याची मागणी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेच्या आयुक्त मंजिरी मनोलकर यांचेकडे प्रत्यक्ष भेटून केली होती.हे विशेष.

**समितीने आयोगालाही कळविले**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल ५ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला आहे.त्यात महाराष्ट्र वित्त आणि लेखा सेवा सहाय्यक संचालक वर्ग १ पदांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातून शिल्पा निलावाड यांची निवड झाली होती.किनवट समितीने पुढिल कारवाईसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला कळविले आहे.

**सात दिवसात सशर्त जातवैधता जमा करा**

किनवट समितीने जातप्रमाणपत्र व सशर्त जातवैधता प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर ते समिती कार्यालयात सादर करण्यासाठी सात दिवसाच्या आत मुदत दिली आहे. विहीत वेळेत जातप्रमाणपत्र व सशर्त जातवैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर न केल्यास अधिनियम २००० मधील कलम १० ते १२ मधील विहीत तरतुदी अन्वये कठोर कारवाई करण्याचा इशारा समितीने दिला आहे.

# वाशिममध्ये आजपासुन 'वऱ्हाडी जत्रा'

## महिला बचत गटांच्या उत्पादनांची भव्य प्रदर्शनी व विक्री

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** महिला स्वावलंबनाचे उद्दिष्ट समोर ठेऊन आणि स्थानिक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणारी जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनी व विक्रीचा उपक्रम दि. 16 पासुन वाशिम येथे 'वऱ्हाडी जत्रा' नावाने आयोजित केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.दि. १६ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड जवळ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेले खाद्यपदार्थ, मसाले, पापड-लोणची, हस्तकला, सजावटीच्या वस्तू, कापडी साहित्य आदींची प्रदर्शनी व विक्री होणार आहे.

**विशेष आकर्षण; फुड कोर्ट:**

या प्रदर्शनिचे विशेष आकर्षण म्हणजे तीनही दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनिमध्ये वाशिमकरांना विविध खाद्य पदर्थांची मेजवानी मिळणार आहे. यासाठी यामध्ये फुड कोर्ट नावाने स्वतंत्र दालन तयार करण्यात आले आहे. यामध्ये अस्सल वऱ्हाडी चवीने समृध्द असलेले मटण- मांडे, सळोई, वऱ्हाडी चिकन, कोंबडी-वडा, ज्वारीची व बाजरीची भाकरी, मिसळीची भाकरी, झुणका भाकर, मिरची ठेचा, वांग्याचे भरीत, हरबऱ्याची भाजी, भरड्याची भाजी, पुरण- पोळी, तीळ-गुळ पोळी, उसळ यासोबतच आणखी विविध खाद्य पदार्थाचा गावरानी मेवा असणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थितीत खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, आमदार भावना गवळी, आमदार किरण सरनाईक, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार धीरज लिंगाडे, आमदार बाबुसिंग राठोड, आमदार अमित झनक, आमदार श्याम खोडे, आमदार सई हडके हे उपस्थित राहणार आहेत.

> 'वहाडी जत्रा' ही केवळ वस्तुंची प्रदर्शनी किंवा पारंपरिक स्वरुपातील जत्रा नसून ग्रामीण महिलांच्या कष्टांना, कौशल्याला आणि स्वाभिमानाला व्यासपीठ देणारा उत्सव आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला बचत गटांच्या उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे. असे आवाहन यांनी केले आहे.
> - अर्पित चौहान (भाप्रसे), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

> 'वहाडी जत्रा' अर्थात बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्री व प्रदर्शनी कार्यक्रमात तीनही दिवस सर्वांनी उपस्थित राहुन उमेद अभियानाला चालना व गती देण्यासाठी सहकार्य करावे.
> -किरण कोवे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण यंत्रणा, जिल्हा परिषद, वाशिम

विशेष निमंत्रित म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक अनुज तारे यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. चे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी केले आहे.

**या तीन दिवसीय वऱ्हाडी जत्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

•दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन, दुपारी १२ ते ६ विविध खेळ व स्पर्धा आणि संध्याकाळी ६ ते ८ विविध नृत्याचे कार्यक्रम होतील.

•दि. १७ जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ बचत गटांच्या यशोगाथा व चित्रफीत प्रदर्शन, संध्याकाळी ४ ते ६ महिलांसाठी विविध स्पर्धा, संध्याकाळी ६ ते ८ भजन आणि रात्री ८ ते १० ऑर्केस्ट्रा होणार आहे.

•दि. १८ जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३ समारोप व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

## जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कोंडमळा येथील जि.प.पूर्व प्राथमिक आदर्श शाळेत पुस्तक पेटी प्रदान सोहळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**चिपळूण(गुरुनाथ तिरपणकर) :** पाठ्यपुस्तका व्यतिरीक्त विविध प्रकाशनची उपयुक्त वाचनिय पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने जनजागृती सेवा संस्थेने मु.कोंडमळा,ता.चिपळूण येथील जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक आदर्श शाळेला४००पुस्तके भेट देण्यात आली.नुकताच हा पुस्तक पेटी प्रदान सोहळा जि.प.पूर्व प्राथमिक आदर्श शाळेच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद घाणेकर हे उपस्थित होते.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक, समाजसेवक-संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे, मुख्याध्यापक संतोष कदम, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गाण्यावर सर्वांग सुंदर समुह नृत्य करुन सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.मुख्याध्यापक संतोष कदम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या पुस्तक भेट उपक्रमाचे कौतुक केले.त्यांच्या शालेयअंतर्गत या उपक्रमाचा फायदा होणार आहे. प्रमुख पाहुणे संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी आपल्या मनोगतात आपण या शाळेचे माजी विद्यार्थी आहोत याचा अभिमानाने उल्लेख केला व शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद घाणेकर यांनी यांनी पुस्तक पेटी प्रदान सोहळ्याचे कौतुक केले व मुलांना शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण करुन मुलांना व्याख्यान्याच्या



माध्यमातून संस्थेने मार्गदर्शन व सहकार्य करावे असे सुचित केले,त्यांची ही मागणी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी मान्य केली आहे.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आणि सहकारी यांनी संपूर्ण शाळेची पहाणी केली, स्वच्छता, उत्कृष्ट रंग रांगोळीच्या माध्यमातून केलेली कलाकुसर व कलाकृती, भिंतीवरील रेखाटलेली ज्ञानात भर घालणारी स्लोगन, संगणक रुम, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी तयार केलेला वाचन कट्टा,मुलांनी सादर केलेली प्रात्यक्षिके हे सर्व पाहून ही शाळा उच्चतम शिखरावर आहे याची जाणीव झाली.अचानक शाळेला भेट देणाऱ्या उप शिक्षणाधिकारी मॅडम यांनी पुस्तक पेटी प्रदान सोहळ्याचे संस्थेचे कौतुक व अभिनंदन केले.हा कार्यक्रम संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी पुढाकार घेऊन विशेष मेहनत घेऊन यशस्वी केला.याप्रसंगी शाळेतील शिक्षकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संस्थेचे शैक्षणिक सन्मानपत्र प्रदान करुन त्यांना सन्मानित करण्यात आले.या उपक्रमासाठी विजय धनावडे, रविंद्र कुलकर्णी,रुपेश सोमण, प्रदीप पाटील,शरद खानविलकर, प्रदीप नेवे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक; मतदान यंत्रांमध्ये जाणीवपूर्वक बिघाड, 'भाजपाचं बटण आपोआप दाबलं जातय, शिवसेनेचा आरोप

महाराष्ट्र जीत

**धुळे :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळी साडेसात वाजेपासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. धुळे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ मधील शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार पार्वती जोगी यांनी मतदान यंत्रांमध्ये (EVM Machines) गंभीर बिघाड असल्याचा आरोप केलाय. "यंत्रात जाणीवपूर्वक बिघाड केला जात आहे, भाजपाचं बटण दाबलं जात आहे, लोकशाही वेठीस धरली गेली आहे, सर्व यंत्रणा मॅनेज आहेत," असा तीव्र आरोप करत त्यांनी मतदान केंद्रांची पाहणी केली. पार्वती जोगी यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडं तक्रार करणार असल्याचंही सांगितलं.

**ईव्हीएम मशीन बंद पडली :** धुळे येथील प्रभाग क्रमांक ११ मध्ये आनंदीबाई जावडेकर शाळेत सकाळी आठ वाजेच्या दरम्यान ईव्हीएम मशीन बंद पडल्यानं, उमेदवार आणि कर्मचारी यांच्यात चांगलीच बाचाबाची झाली. तसंच या ठिकाणी नागरिकांकडून देखील अधिकारी यांच्यावर रोष व्यक्त करण्यात आला. अर्ध्या तासापासून ईव्हीएम मशीन बंद असल्यानं मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी प्रभागातील नागरिकांनी गर्दी केली होती.

**उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार :** धुळे महापालिकेच्या १९ प्रभागांसाठी तब्बल ३१६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून आज होणाऱ्या मतदानानंतर उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. धुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा ही स्वबळावर निवडणूक लढवत असून शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) युती झाल्याचं चित्र पाहायला मिळालं. तर दुसरीकडं भाजपाला पराभूत करण्यासाठी



महाविकास आघाडी एकत्रित आली होती. एमआयएमने देखील तब्बल २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत.

**तृतीयपंथी बांधवांनी बजावला मतदानाचा हक्क :** धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मूलभूत सोयी सुविधांसोबत धर्माचा मुद्दा प्रचंड गाजला होता. महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचार सभा झाल्या होत्या. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) मंत्री अदिती तटकरे यादेखील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी त्यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. मात्र, महाविकास आघाडीचा एकही नेता प्रचाराच्या मैदानात उतरल्याचं पाहायला मिळालं नाही. यामुळं आज होणाऱ्या मतदानानंतर मतदारांचा कौल कुणाच्या बाजूने असणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

धुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तब्बल ५१९ मतदान केंद्र उभारण्यात आली असून, ३५०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. धुळे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानाला सुरुवात झाली असून शहरातील प्रभाग क्रमांक १६ मधील तृतीयपंथी बांधवांनी मतदानाचा हक्क बजावला.